# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सातारा जिल्ह्यातील जगप्रसिध्द कास माळरान व कास तलावाच्या पसिरात अवैध उत्खनन केल्याबाबत

**(१) ५२६७ (०४-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील जगप्रसिध्द कास माळरान व कास तलावाच्या पसिरात अवैध उत्खनन केल्याबाबत जावळीच्या महसूल विभागाने नुकतीच कार्यवाही केल्याची बाब उघडकीस आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वस्तुतः अशा प्रकारचे उत्खनन या परिसरात वर्षभरापासुन सुरु असून लाखो रुपयांची शासनाची रॉयल्टी बुडवली जात आहे हे खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार काय कार्यवाही करयात आली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-११-२०१५) :**(१), (२) व (३)

मौजे कास येथील गट नं. १२५ मधील सातारा नगरपरिषद यांच्या मालकीच्या तलावाची साठवणक्षमता वाढविण्यासाठी नगरपरिषदेमार्फत गाळ उत्खननाबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करुन १८,००० घनमिटर (६३३० ब्रास) इतका गाळा काढून, तलावाजवळील शेतकऱ्यांना विनामोबदला देण्यात आली आहे.

मौजे कास येथील सदर तलावाच्या नजिकच्या जमिनी मध्ये ८३ ब्रास मातीचे अवैध उत्खनन केल्याबाबत, तहसिलदार जावळी यांनी संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला असून संबंधित आरोपीस अटक करण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ता.नांदगाव खंडे (जि.अमरावती) या तालुक्यातील लोणी टाकळी-अजनी-फुल आमला या रस्त्यावरील अवैध रेती वाहतूक करणा-या जीवघेण्या वाहतुकीस तात्काळ प्रतिबंध करण्याबाबत**

**(२) ५६७२ (०४-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.नांदगाव खंडे (जि.अमरावती) या तालुक्यातील लोणी टाकळी-अजनी-फुल आमला या रस्त्यावर रात्रीच्या अवैध वाळू रेतीची वाहतूक करणा-या ट्रॅक्टर भरधाव वाहतूक करीत असल्यामुळे अनेकांना आपला प्राण अपघाता मध्ये गमवावा लागला असल्यामुळे सदरहू अवैध रेती वाहतूक करणा-या जीवघेण्या या वाहतुकीस तात्काळ प्रतिबंध करण्याबाबत व रेती माफीयावर कठोर कारवाई करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे, यांना दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-११-२०१५) :**(१) होय.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांनी दिलेल्या सूचनांनुसार तहसिलदार नांदगांव खंडेश्वर यांनी तलाठी व मंडळ अधिकारी यांची पथके गठित केली. तसेच पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन विभाग, यांना रात्रीचे वेळी अवैध रेती वाहतूकीस प्रतिबंध करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोहोरगांव (जि.सोलापूर,ता.पंढरपूर) येथे भीमा नदीतील वाळूचा लिलाव करण्यात आल्याबाबत.**

**(३) ६०७० (०४-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात पोहोरगांव येथे ग्रामपंचायतीचा विरोध डावलून भीमा नदीतील वाळूचा जानेवारी, २०१५ मध्ये लिलाव करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील ग्रामपंयाचतीचा विरोध डावलून वाळूचा लिलाव करण्याची कारणे काय आहेत,

(३) वाळूच्या लिलावामुळे वाळूची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने गावातील रस्ते खराब झाल्याने नागरिकांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पोहोरगांव ग्रामपंचायतीचा विरोध डावलून वाळूचा लिलाव करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-१२-२०१५)** :(१) व (२) सन २०१४-१५ या वर्षाकरीता सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील मौजे पोहोरगांव येथील वाळूच्या लिलावाकरीता ग्रामसभेची शिफारस मागविण्यात आली होती. तथापि, शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०५१२/प्र.क्र.३००/ख, दि.१२.३.२०१३ मधील तरतुदीनुसार संबंधित ग्रामपंचायतीकडून १५ दिवसांच्या कालावधीत निर्णय प्राप्त न झाल्याने, ग्रामसभेची मानीव सहमती आहे, असे गृहीत धरुन लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.
(३) वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे सदर गावातील रस्ते खराब झाल्याची बाब दृष्टीत्पत्तीस आल्यानुसार, सदर रस्त्याच्या कामाची अंदाजपत्रके मागविण्यात येऊन, गौण खनिज स्वामित्वधनातून ग्रामपंचायत अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून सदर रस्त्याच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजगुरु नगर (ता.खेड, जि.पुणे) येथील बहुचर्चीत इनरकॉन वन उर्जा कंपनीने मोठ्या प्रमाणात उत्खनन करुन गौण खजीन प्रकरणी महसूल बुडविल्याबाबत**

**(४) ६६१७ (०४-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजगुरु नगर (ता.खेड,जि.पुणे) येथील बहुचर्चीत इनरकॉन वन उर्जा कंपनीने पवन चक्या उभारतांना मोठ्या प्रमाणात उत्खनन करुन गौण खजीन प्रकरणी महसूल करापोटी शासनास द्यावयाची रक्कम दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनी विरुध्द शासनाच्या महसूल खात्याने आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे,
(३) अद्याप सदर कंपनी विरोधात कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-१०-२०१५)** :(१) व (२) इनरकॉन वन ऊर्जा कंपनीने मौजे वांद्रे, वेल्हावळे, वाहगांव, कुडे (बु.) या गावातून विना परवानगी २६००० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याप्रकरणी तहसलिदार राजगुरुनगर (खेड) यांनी रु. ५,९५,००,०००/- एवढया दंडाच्या रकमेचे आदेश पारित केले आहेत. उपविभागीय अधिकारी खेड यांनी रु. ५,९५,००,०००/- ही रक्कम जमिन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसुल करण्याचे निर्देश तहसिलदार राजगुरुनगर (खेड) यांना दिले आहेत. त्यानुसार वसुलीची कार्यवाही सुरु आहे. दंडाच्या रकमेच्या वसुलीसाठी तहसिलदार राजगुरुनगर यांच्याकडून सदर कंपनीच्या मौजे वांद्रे,

वेल्हाबिळे, वाहगांव, कुडे (बु) येथील उर्जा निर्मितीच्या चक्क्या बंद करणे व कंट्रोल रुम सील करण्याची कार्यवाही सुरु आहे. कंपनीने तहसिलदार खेड यांच्या आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी राजगुरुनगर यांचेकडे अपील दाखल केले असून, सदर अपील दाखल करुन घेण्याच्या मुद्दयावर आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**करकंब (ता.पंढरपूर, जि.उस्मानाबद) येथे महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता कार्यालय होण्याबाबत**

**(५) १०३२५ (०४-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करकंब (ता.पंढरपूर, जि.उस्मानाबद) येथे महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता कार्यालय होण्याबाबत मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी यांचेकडे मुख्य व्यवस्थापक (ताआ) यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पंढरपूर ग्रामीण -१ व पंढरवूर ग्रामीण -२ उपविभागाचे विभाजन करुन. नवीन करकंब ता. पंढरपूर येथे महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता कार्यालय सुरु करणे, आवश्यक निकष/ मानकांअभावी शक्य नाही.

---

**शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) गोरगरिबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याबाबत**

**(६) ११२७६ (०६-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) गोरगरिबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याने अनेक गोरगरीब नागरिक या योजनांपासून वंचित असल्याबाबत त्यांच्या मागण्यांचे संयुक्त सह्याचे निवेदन दि. ५.११.२०१४ रोजी शिरोळ तालुका शेतमजुर श्रमिक संघटना यांनी तहसिलदार, शिरोळ, जि.कोल्हापूर यांना दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनास कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे,
(३) या प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-११-२०१५) :**(१) शिरोळ तालुका शेतमजुर श्रमिक संघटना यांनी त्यांच्या मागण्यांचे निवेदन दि. ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी तहसिलदार यांना दिले आहे,

(२) व (३)

१. शेतमजूर सर्व्हे कधी सुरु करणार आहात या विषयी खुलासा करावा.

२. अनेक वर्षे गोरगरीबांचे रखडलेले रेषनकार्ड विभक्त करुन मिळावेत.

३. 'भिक मागो आंदोलन ' वेळी दिलेल्या लेखी पत्राची त्वरीत अंमलबजावणी करावी.

४. शिरोळ ग्रामीण दवाखान्याचे डॉक्टर बेकायदेशीर रु. ५०/- घेतल्याशिवाय सामान्य नागरीकांना वयाच दाखला देण्यास तयार नसतात. त्यांना तो मोफत मिळावा.

५. तलाठी यांचेकडून सामान्य नागरिकांना होणारा मानसिक त्रास थांबवावा.

६. जेष्ठ नागरीकांच्य एस.टी पाससाठी वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला दाखला True Copy (सत्यप्रत) केला असेल तरी स्विकारावा व तो ग्राहय मानावा.

७.श्रावणबाळ, संजय गांधी या योजनेचे सर्व कागदपत्रे तयार करुन तलाठयाकडे दिले असता त्याची पोहच मिळत नाही, ती मिळावी.

८. मौजे तमदलगे, जांभळी, शिरढोण,टाकवडे, शिरदवाड, चिपरी,शिवणाकवाडी, राजापूर या गावचे तलाठी व शिरोळ ग्रामीण आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक व्हावी.

९. सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांना शासकीय अधिकाऱ्यांकडून सन्मानाची वागणूक मिळावी.

वरील मागण्यांबाबत तहसिलदार कार्यालयाच्या स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्या आली असून संबंधित विभागांना योग्यत्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

### वांद्रे -कुर्ला संकुलाच्याधर्तीवर ठाणे जिल्हयातील कळवा-खारेगाव येथे मध्यवर्ती व्यवसाय संकुल उभारण्याबाबत

**(७) १४९३५ (०७-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर ((सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर ठाणे जिल्हयातील कळवा-खारेगाव येथे मध्यवर्ती व्यवसाय संकुल उभारण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रकल्पासाठी पायाभुत सुविधा उपलब्ध करुन सदरील प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-११-२०१५) :**(१), (२) व (३) मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील खारभूमी विभागाची जमीन विविध शासकीय/निमशासकीय प्रयोजनासाठी त्या त्या विभागांना दिनांक २९/०३/२०१२ च्या ज्ञापनाद्वारे मंजूर करण्यात आली आहे.

मौजे कळवा ता.जि.ठाणे येथील विविध विभागांना प्रशासकीय प्रकल्प राबविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या विषयाधीन जमिनीवरील प्रकल्प मार्गी लावण्यासाठी बैटक आयोजित करुन आदेश देण्याची विनंती माहे जानेवारी, २०१५ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. त्यानुषंगाने दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या प्रायोजनासाठी दिलेली जमीन वगळता उर्वरित शासकीय जमीन सुनियोजित पध्दतीने विकासित करण्याकरिता विभागीय आयुक्त, कोकण यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मदतीने “Central Business District” चा बृहत आराखडा तयार करुन घेण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

---

**राज्यातील गौणखनिजांच्या रॉयल्टीमध्ये दुप्पट वाढ करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(८) १६५३३ (११-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गौणखनिजांच्या रॉयल्टीमध्ये दुप्पट वाढ करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे बांधकाम खर्चात वाढ होणार असल्याने घराच्या किंमतीतही वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गौण खनिजाच्या रॉयल्टीमधील वाढ कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-११-२०१५) :**(१), (२) व (३) खाण व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ मधील तदतूदनुसार प्राप्त अधिकारानुसार, राज्य शासनाने ५ वर्षानंतर दि. ११ मे, २०१५ च्या अधिसूचनेद्वारे गौण खनिजावरील स्वामित्वधनाच्या दरात दुप्पट वाढ केली आहे, त्यानुसार दगड , माती व मुरुम या गौण खनिजाचे दर रु. १००/- ते रु. ४००/- प्रतिब्रास या दरम्यान आहेत. गौण खनिजाचे बाजारातील दर विचारात घेता स्वामित्वधनाच्या दरात केलेली वाढ योग्य असल्याने, ती कमी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवळा क्षेत्र (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील ११ के.व्ही. लाईनचे वाकलेले पोल त्वरीत दुरुस्त करण्याबाबत**

**(९) १६९८२ (१०-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर ((सोनावणे) (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवळा क्षेत्र (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील ११ के.व्ही. लाईनचे वाकलेले पोल त्वरीत दुरुस्त करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मार्यदित अमरावती यांना दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने पोलची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :**(१) होय.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, महावितरण, अमरावती विभाग यांच्या कार्यालयाकडून दि.३० मे,२०१५ रोजी मौजा जवळा येथील ११ के.व्ही. वाहिनीचे वाकलेले पोल सरळ करण्यात आले व त्याप्रमाणे मा.प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांना दिनांक १२.०८.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धर्माबाद (जि.नांदेड) येथे चारचाकी वाहनाने विद्युत खांबाला धडक देऊन पाडल्याचा गुन्हा दाखल न करण्यासाठी १३ हजाराची लाच घेतल्याबाबत**

**(१०) १७१४७ (१०-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) येथे चारचाकी वाहनाने विद्युत खांबाला धडक देऊन पाडल्याचा गुन्हा दाखल न करण्यासाठी १३ हजाराची लाच येथील वीज वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, लाईन हेल्पर यांनी घेतली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही कली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१५)** :(१) व (२) होय, हे खरे आहे. संबंधित सहायक अभियंता व कनिष्ठ तंत्रज्ञ यांना महावितरण कंपनीने निलंबित केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एकूण रोहित्रावरील विज वापराच्या हिशोबाकडे**
**महावितरण कंपनीने दुर्लक्ष केल्याबाबत**

**(११) १९२१९ (१०-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण ३,५१,१४९ वितरण रोहीत्रापैकी २,१९,४३१ ट्रान्सफॉर्मरचे मिटरींग झाले असून मिटरींग रोहीत्रापैकी केवळ ७५७५ म्हणजे केवळ ३.५ टक्के रोहित्रावरील विज वापराचा माहे एप्रिल, २०१३ चा हिशोब उपलब्ध असून, बाकी ९६.५ टक्के रोहित्रावरील विज वापराचा हिशोबाकडे महावितरण कंपनीने दुर्लक्ष केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१३ च्या सुमारास स्वता मुख्य अभियंता यांनी राज्यातील महावितरणच्या सर्व मुख्य अभियंतांना कळविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ४७ टक्के ठिकाणी, दिलेल्या विजेपेक्षा जास्त विज आकारणी केली असून ही रक्कम सन २००८ पासून प्रति वर्षी ७२०० कोटी रु. असल्याची बाब विज ग्राहक संघटनेने माहे ऑगस्ट, २०१३ च्या सुमारास निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विज वापराची बनावट आकडेवारी दाखवून शेतक-यांचा बळी देवून गळती लपवायची व भ्रष्टाचाराला संरक्षण देवून सरकारचे अनुदान फुकटात मिळवायचे व दरवाढ करुन ‘अ’ पत नामांकन ही मिळवायचे याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५)** :(१) महावितरण कंपनीच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून उपलब्ध अहवालानुसार महिन्यातील एकूण मिटरिंग झालेल्या रोहित्रांपैकी ३.५ % रोहित्रांचे लेखांकन झाल्याचे निदर्शनास आले असून सदर टक्केवारीमध्ये सुधारणा करण्याबाबत महावितरणकडून त्यांच्या दिनांक १०/०७/२०१३ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) शेतकऱ्यांचा वीज वापर हा रोहित्रावरील मिटर रिडींग प्रमाणे ठरविण्यात येत नाही. राज्यातील मिटर असलेल्या कृषी ग्राहकांचा वीज वापर मिटर रिडिंग प्रमाणे व मिटर नसलेल्या कृषी ग्राहकांचा वापर मा.विद्‌युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या मापदंडाप्रमाणे, मिटर असलेल्या कृषी ग्राहकांच्या वीज वापरावरुन ठरविण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण जनतेला आठवड्यातील सातही दिवस २४ तास वीज पुरवठा देण्याबाबत**

**(१२) १९२७७ (१०-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण जनतेला आठवड्यातील सातही दिवस २४ तास वीज पुरवठा देण्याचे उद्दिष्ट राज्य शासनाने निश्चित केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाची दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेचे प्रभावी अंमलबाजवणी करण्यासाठी राज्यस्तरीय स्थायी समितीची स्थापना करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य स्तरीय समितीमध्ये राज्याच्या मुख्य सचिव, वित्त, महसूल, ग्रामविकास उर्जा या खात्यांचे सचिव व आरईसीच्या प्रतिनिधींचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ग्रामीण जनतेला आठवड्यातील ७ दिवस २४ विजपुरवठा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे,

(२) होय, हे खरे आहे,

(३) होय, हे खरे आहे,

(४) केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत प्रस्तावित कामांविषयीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तांत्रिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या तपासून नोडल एजन्सी रुरल इलेक्ट्रीफीकेशन कॉरपोरेशन (REC) मार्फत केंद्र शासनाकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील साखरीनाटे गाव परिसरात गेल्या कित्येक वर्षापासून विद्युत पोल गंजलेले असल्याबाबत**

**(१३) १९६२१ (१०-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील साखरीनाटे गाव परिसरात गेल्या कित्येक वर्षापासून विद्युत पोल गंजलेले अवस्थेत असल्याने ते पोल कधीही तुटून खाली पडण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्युत पोल, जुन्या तारा महावितरणने त्वरित बदलाव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अभियंता यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने गंजलेले पोल बदलण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे,
(२) हे खरे आहे,
(३) होय.
(४) साखरीनाटे परिसरात गेल्या दोन महिन्यात ६२ पोल बदलण्यात आले असून १६ गाळ्यामधील विद्युत तारा बदलण्यात आल्या आहेत. तसेच ३५ पोल बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात क्रॉम्प्टनकडून देण्यात येणारे विजेचे बिल आणि प्रत्यक्ष मीटर रिडिंग यामध्ये तफावत असल्याबाबत**

**(१४) १९९९५ (१०-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयात क्रॉम्प्टनकडून देण्यात येणारे विजेचे बिल आणि प्रत्यक्ष मीटर रिडिंग यामध्ये तफावत असून ही तफावत दुरुस्त करून देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३)असल्यास चौकशीनुसार क्रॉम्प्टन कंपनीच्या बिल दुरुस्त करुन देण्यास टाळाळाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही,
(२) प्रश्न उद्भवत नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग व पेण येथील खाडी किनारी असलेल्या ग्रामीण भागातील वीज खांब बदलण्याबाबत**

**(१५) २०१२३ (१०-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग व पेणे बहुसंख्या गावे खाडीलगत असून दमट हवामान व क्षारयुक्त वातावरणामुळे तेथील जमिनीत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कपंनीमार्फत उभारणेत असलेले वीज खांब गंजून सडल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी संपूर्ण तालुक्याचा सर्व्हे करून धोकादायक असलेले खांब बदलण्याबाबत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे कोणती ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने अलिबाग व पेण तालुक्याचा सर्व्हे करुन जीर्ण/गंजलेले धोकादायक असलेले एकूण १६६२ विजेचे खांब बदलण्याबाबत नियोजन केले आहे व त्याप्रमाणे ११४ पोल बदलण्याचे काम इंन्फ्रा-२ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर उत्तर भागातील पाटणकर चौक ते बजाज डी.एड. कॉलेज सीएपीडीआय मार्ग रस्त्यांच्या मधोमध १५० विजेचे खांब असल्याबाबत**

**(१६) २११२६ (०६-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर उत्तर भागातील पाटणकर चौक ते बजाज डी.एड. कॉलेज सीएपीडीआय मार्ग रस्त्यांच्या मधोमध १५० विजेचे खांब आहेत, हे खरे आहे काय,

(२) मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठांनी रस्त्याच्या मधोमध असलेले विजेचे खांब काढण्याचे निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मधोमध असलेल्या खांबामुळे वांरवांर अपघात होत असल्याचे नागरिकांनी अधिका-यांनकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित विभागाचे अधिकारी विद्युत खांब काढण्यास दिरंगाई करीत असल्याबाबत यांचावर कोणती कारवाई केली वा करीत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) सदर रस्त्याच्या मधोमध १२४ विजेचे खांब आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) अशा प्रकारची तक्रार संबंधित कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) सदर रस्त्यावरील खांब हटविण्याचे ९०% काम पूर्ण झाले आहे. परंतु खांब क्र.एस.एल/६० या ठिकाणी वीज संच मांडणीचे काम योग्य जागेअभावी प्रलंबित आहे.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील तहसील कार्यालयातील**
**३ नायब तहसिलदारांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१७) २१६६५ (१०-०८-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथील तहसील कार्यालयातील ३ नायब तहसिलदारांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे सामान्या नागरिकांना दाखले देणे इ.कामे खोळंबलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सामान्य नागरिकांचे तहसील कार्यालयातील कामे ठप्प पडले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-१०-२०१५) :**(१) खामगाच तहसिल कार्यालय जि.बुलढाणा या कार्यालयात नायब तहसलिदार संवर्गातील १ पद रिक्त आहे.

(२) व (३) हे खरे नाही. सामान्य नागरिकांना दाखले देणे, शेतकऱ्यांना दाखले देणे इ. कामे तहसिल कार्यालयामधून नायब तहसिनदार यांच्याकडून लवकरात लवकर करण्यात येत आहे.

(४) तहसिल कार्यालय खामगाव , जि.बुलढाणा या कार्यालयात एकूण ५ नायब तहसिलदारांची पदे असून त्यापैकी ३ पदे रिक्त होती. रिक्त ३ पदांपैकी २ पदे भरण्यात आली असून उर्वरित रिक्त १ पदे सरळसेवेने उपलब्ध अधिकाऱ्यांमधून अथवा पदोन्नतीने विभागीय आयुक्त कार्यालयाकडून भरण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आक्षी-साखर (ता.अलिबाग,जि.रायगड) खाडी लगत मच्छिमारी जेट्टी बांधणेबाबत**

**(१८) २१७५१ (१२-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आक्षी-साखर येथे मच्छीमारांनी सन २०११ वा त्या सुमारास व तद्‌नंतर सन २०१५ पर्यंत अनेक वेळा शासनाकडे जेट्टी बांधणेबाबत मागणी करूनही जेट्टी बांधकामास मंजूरी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ११ व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत मत्स्य आयुक्तांमार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत थेरोंडा, आक्षी-साखर, सासवणे येथील मच्छीमार केंद्रे विकसीत करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावात मच्छीमार केंद्रे विकसीत करणेच्या दृष्टीने मंजूरी देण्यास विलंब होण्याची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. तथापि थेरोंडा, आक्षी-साखर, सासवणे येथे जेट्टी बांधण्याचे काम हे नाबार्ड टप्पा क्रमांक-१९ अंतर्गत घेण्यात आलेले होते व सर्व कामांचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम हे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे सोपविण्यात आले होते. परंतु नाबार्ड टप्पा -१९, नाबार्डने रद्द केले आहे. तथापि थेरोंडा येथील बंदराचे कामास नाबार्ड टप्पा-२० अंतर्गत मंजूरी प्राप्त झाली आहे.

---

**ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात वसलेल्या सोनशेत**
**या वस्तीत गेली ४० वर्षे वीज नसल्याबाबत**

**(१९) २२२६३ (०६-०८-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात वसलेल्या अवघ्या ३५ घरांच्या सोनशेत या वस्तीत गेली ४० वर्षे वीज नसल्याचे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण कंपनीचे अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे आदिवासी वस्त्यांत अंधारमय वातावरण आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करुन वीज जोडणी करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही करणार वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. सोनशेत हा शहापूर तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी पाडा असून सदरहू पाड्याचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही. सोनशेत आदिवासी पाड्याचे जिल्हा वार्षिक नियोजन समिती योजनेंतर्गत विद्युतीकरणाच्या अंदाजपत्रकानुसार सोनशेत पाड्यासाठी स्वतंत्र केव्हीए क्षमतेचे रोहित्र कार्यान्वित करुन जून, २०१५ अखेर विद्युतीकरण पूर्ण करण्यात आले आहे. सदरच्या आदिवासी पाड्याचा विद्युत पुरवठा चालु करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरखेडी (ता.सिंदखेड राजा जि.बुलढाणा) परिसरात मनमाणी पध्दतीने वितरण कंपनीच्या कर्मचा-यांवरुन लोड शेडींग करण्यात येत असल्याबाबत**

**(२०) २२३२७ (०६-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेडी (ता.सिंदखेड राजा जि.बुलढाणा) परिसरात मनमाणी पध्दतीने वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून लोड शेडींग करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडे स्थानिक लोकप्रतीनिधीं यानी एप्रिल, मे, २०१५ रोजी व त्या सुमारास तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीवर या परिसरातील लोड शेडींग बंद करण्यासाठी शासनातर्फ कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एप्रिल २०१५ मध्ये देय असलेल्या महावितरण कर्मचा-यांचा पगारवाढीच्या थकबाकिबाबत**

**(२१) २२९२५ (१०-०८-२०१४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एप्रिल २०१५ मध्ये देय असलेल्या महावितरण कर्मचा-यांचा पगारवाढीच्या थकबाकीचा २०० कोटी रुपयांचा हप्ता थकल्याने राज्यभरातील ७६ हजार कर्मचा-यांना आर्थिक नुकसान झाल्याचे मे २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सन २०१३ च्या वेतनवाढीच्या करारानूसार वाढीव वेतन कर्मचा-यांना तातडीने मिळण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१५) :**(१) होय.

(२), (३) व (४) कर्मचारी संघटना व व्यवस्थापन यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तीच्या आधीन राहून महावितरण कंपनीमधील अधिकारी/कर्मचारी यांना वाढीव वेतन माहे ऑगस्ट, २०१४ च्या वेतनापासून अदा करण्यात येत आहे.

उपरोक्त करारानुसार माहे एप्रिल, २०१३ ते जुलै, २०१४ या कालावधीत थकबाकीची रक्कम ४ टप्प्यांमध्ये अदा करण्याचा निर्णय घेण्याचा आला आहे त्यानुसार वाढीव वेतनपोटी माहे एप्रिल, २०१३ ते जुलै, २०१३, ऑगस्ट २०१३ ते नोव्हेंबर, २०१३ व डिसेंबर, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीत फरकाची रक्कम यापूर्वीच अदा केली आहे.

वाढीव वेतनपोटी माहे डिसेंबर, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीच्या फरकाची रक्कम एप्रिल, २०१५ देय होती. सदर रक्कम वित्तीय भार व कंपनीची आर्थिक परिस्थिती यांचा आढावा घेऊन माहे मे, २०१५ च्या पहिल्या पंधरवड्यामध्ये अदा करण्यात आली आहे.

---

**जळगाव शहरातील क्राम्प्टन कंपनीत वीज मीटर नसल्याने घरगुती ४५० तर कृषी पंपधारकाचे ८५० असे एकूण १३०० कनेक्शन प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) २३००० (०६-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील क्राम्प्टन कंपनीत वीज मीटर नसल्याने घरगुती ४५० तर कृषी पंपधारकाचे ८५० असे एकूण १३०० कनेक्शन प्रलंबित असल्याची बाब १५/५/२०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराचा विस्तार दिवसेनदिवस वाढत असताना वीज ग्राहकांनी रितसर अर्ज करुन तर काही ग्राहकांनी डिमांड नोट भरुन सुद्धा ग्राहकांना क्रॉम्पटन कंपनीकडे वारंवारवीज जोडणीसाठी फेऱ्या माराव्या लागत असल्याने ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रॉम्प्टन कंपनीला मागेल त्यास वीज कनेक्शन देणेबाबत शासनामार्फत काय कार्यवाहीकरण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) जळगाव शहर व ग्रामीण भागात वीज मिटर अभावी घरगुती ग्राहकांची ४३०, तर कृषी पंपधारकांचे २६४ अशा एकूण ६९४ वीज जोडण्या मे, २०१५ अखेर प्रलंबित होत्या.

(२) हे खरे आहे.

(३) क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंपनी कडून दि.१२.०८.२०१५ रोजी महावितरण कंपनीने वीज वितरणाचा संपूर्ण कार्यभार हाती घेतला आहे व पुढील कामकाजाला सुरुवात केलेली आहे. महावितरणने एक खिडकी योजनेद्वारे व शिबीर घेवून नवीन कनेक्शन देणे सुरु केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घारापुरी (ता.उरण, जि.रायगड) येथील घारापूरी बेटाला कायमस्वरुपी वीज मिळण्याबाबत**

**(२३) २३६०९ (१०-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घारापुरी (ता.उरण, जि.रायगड) येथील घारापूरी बेटाला कायमस्वरुपी वीज मिळावी सर्व शासकीय स्तरावरुन प्रयत्न होत असताना घारापूरी ग्रामपंचायतीने मात्र वीज मिळावी याकरिता संबंधित विज कंपनीकडे कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याचे माहे मे २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सध्या विद्युत जनित्रामार्फत तीन पैकी राजबंदर, शेतबंदर या दोन गावांना सायंकाळी साडेतीन तासाचा वीजपुरवठा केला जात असून मागील ३० वर्षापासून विद्युत जनित्रासाठी शासकीय स्तरावरुन डिझेलसाठी लाखो रुपये अनुदान दिले जात असून या अनुदानातही मोठा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आले आहे, ही गोष्ट खरे आहे काय,

(३) असल्यास, घारापुरी बेटाला कायमस्वरुपी वीज मिळण्यासाठी शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने घारापुरी बेटाला कायमस्वरुनी विद्युत पुरवठा करण्याची प्रक्रिया चालू केली होती. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी दिनांक १८.८.२०११ रोजी कळविलेल्या पत्रानुसार सदर प्रक्रिया स्थगित करुन रद्द करण्यात आली. मे २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार घारापुरी बेटावर विद्युतीकरणासाठी पुनश्च: सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सुधारीत अंदाजपत्रकाची रक्कम सुमारे रु. १६.६० कोटी आहे. त्यास अनुसरुन एलिफंटा लेणी (घारापूरी बेट) ता.उरण, जि.रायगड येथे विद्युत करण्यासाठीच्या प्रस्तावाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्याकडून निधी उपलब्ध झाल्यास त्वरीत निवदा काढळून विद्युतीकरणाची प्रकिया पूर्ण करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) ग्रामपंचायत तालुक्यातील कोपर हद्दीत अद्रेका बिल्डर्स यांनी भरणीची रॉयल्टी भरली नसल्याबाबत**

**(२४) २३७४३ (१०-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) ग्रामपंचायत कोपर हद्दीत अद्रेका बिल्डर्स यांनी प्रचंड प्रमाणत भरणी केली असून त्यांनी रॉयल्टी भरली नसल्याबाबतची तक्रार तहसिलदार, भिवंडी यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१२-२०१५) :**(१), (२) व (३) प्रश्नाधीन विषयाबाबत तहसिलदार भिवंडी यांच्यावर लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, मे अद्रेका डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी मौजे कोपर, ता. भिवंडी येथील त्यांच्या मालकीच्या जागेवर भराव केल्याबाबत तहसिलदार भिवंडी यांच्याकडून दंडात्मक आदेश पारित करण्यात आले आहेत व दंडाच्या रकमेच्या वसुलीसाठी संबंधित विकासकाच्या जमिनीच्या गाव नमुना नंबर ७/१२ सदरी इतर हक्कात बोजा चडविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील कर्णिक नगर को.ऑ.हौ.सोसायटीची जागा**
**जिल्हाधिकारी यांनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु केल्याबाबत**

**(२५) २३९३९ (०६-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील कर्णिक नगर को.ऑफ को.हौ.सोसायटी ही शासकीय कर्मचाऱ्यांची सोसायटी असून या सोसायटीचा बी ग्रुपमध्ये १२१ सभासदांना बेकायदेशीरपणे घेण्यात आल्यामुळे शर्थभंग झाल्यामुळे मा.जिल्हाधिकारी यांनी सोसायटीची जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येत असल्याचे माहे मे २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शर्थभंग करणाऱ्या सभासदांवर कारवाई करण्याबाबत तसेच सोसायटीची जागा ताब्यात घेण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणी मा.उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार, रमाकांत कर्णिकनगर सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. सोलापूर या संस्थेच्या १२१ सभासदांच्या जागेवरील झालेल्या इमारतीच्या बांधकामसह संपूर्ण जागा सरकार जमा करुन, सदर जागेच्या मिळकतपत्रिकेवर आदेशाची नोंद घेण्यात येऊन सदर ठिकाणी असलेल्या सर्व बेकायदेशीर वहिवाटादारांना जागा खाली करुन देण्याकामी संयुक्तपणे सदर जागा ताब्यात घेणेची कार्यवाही करणेकामी उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती शहरात एकात्मीक उर्जा विकास अंतर्गत भुमिगत विद्युत वाहीनी टाकण्याबाबत**

**(२६) २४०७४ (१६-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात एकात्मीक उर्जा विकास अंतर्गत भुमिगत विद्युत वाहीनी टाकण्याच्या प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून या प्रस्तावास मान्यता प्रदान करावी या आषयाचे एक पत्र विधानसभा सदस्य, अमरावती यांनी मा. उर्जा मंत्री यांना माहे मे २०१५ वा त्यादरम्यान दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला शासनाने मान्यता दिली आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१२-२०१५) :**(१) हे खरे आहे,

(२) एकात्मिक ऊर्जा विकास योजनेतंर्गत अमरावती शहरात भूमिगत विद्युत वाहिनी व अन्य कामांचा रु. ९४.८८ कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे,

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीयकृत बँकाकडून पीककर्ज, कृषि पूरक कर्जासाठी अडीच टक्के नोंदणी खर्च स्टॅम्प ड्युटी रद्द करण्याबाबत**

**(२७) २४३७८ (१०-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गारपीट, सतत पडणारा दुष्काळ, यामुळे एक लाखावर कर्ज घेणा-या शेतक-यांना राष्ट्रीयकृत बँकाकडून पीककर्ज, कृषि पूरक कर्जासाठी अडीच टक्के नोंदणी खर्च स्टॅम्प ड्युटी आकारली जाते, हे खरे आह काय,

(२) असल्यास, सदरची स्टॅम्प डयुटी व नोदणी खर्च रद्द करावा, अशी मागणी सर्व शेतक-यांनी मा.महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे मे, २०१५ च्या सुमारासपासून वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

पीकाच्या गहाण खतसाठी ०.५% इतक्या दराने मुद्रांक शुल्क देय आहे. तसेच निष्पादकांना गहाणखताच्या दस्तावर रु.२०/- पेक्षा जास्त असलेली अकारणीयोग्य नोंदणी फी भरण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत शासनाने यापूर्वीच आदेश निर्गमित केले आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र.एसटीपी-१७८६/प्र.क्र.१९४/म-१, दि.७/२/१९९० अन्वये गहाणखत, हमीपत्र, तारणठेव, राखपत करारनामा/अभिस्विकृती, कर्जहमी याप्रकारच्या कृषी संलग्न दस्तांना व शासन आदेश क्र.मुद्रांक-२००६/प्र.क्र.९४/म-१ दि.२५ एप्रिल, २००८ अन्वये पीककर्जाच्या गहाणखताला मुद्रांक शुलक भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील शेतक-यांना बोअरवेल व विहिरीवर विद्युत जोडणी करुन मिळण्याबाबत**

**(२८) २४७८६ (१०-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील ४५७२ शेतक-यांनी बोअरवेल व विहिरीवर विद्युत जोडणी करुन मिळण्यासाठी जिल्हयाच्या महावितरण मंडळाकडे आवश्यक ती रक्कम भरणा करुन देखील महावितरणाकडून अद्यापही विद्युत जोडणी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार विद्युत जोडणी देण्याचे दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे. सप्टेंबर २०१५ अखेरीस अहमदनगर जिल्हयातील ६१८८ शेतकऱ्यांनी बोअरवेल व विहीरीवरील विद्युत जोडणी करुन मिळण्यासाठी महावितरणाकडे आवश्यक त्या रकमेचा भरणा केलेला आहे. सन २०१५-१६ मध्ये ऑगस्ट, २०१५ पर्यंत एकूण १०८७ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(२) सदरील कामे पयाभूत आराखडा-२ योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आली असून ती प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मु. त्रिंबक बगाडवाडी (ता.मालवण, जि.सिधुदुर्ग) येथील भूभाग आकारण्यात येणा-या बिनशेती जमिनीच्या महसूल रक्कमेबाबत**

**(२९) २४८५१ (०६-०८-२०१५). श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्काम त्रिंबक बगाडवाडी (ता.मालवण, जि.सिधुदुर्ग) येथील भूभाग क्र. ५६१ वर आकारण्यात येणा-या बिनशेती जमिनीच्या महसूल रक्कमेबाबत मा.जिल्हाधिकारी यांना दिनांक १० सप्टेंबर, २०१२ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना आकारण्यात येणा-या महसूल रक्कमेबाबत अद्यापपर्यंत तपशिल देण्यात आलेला नाही, सदर भूभाग बिनशेती झालेली नसतानाही महसूल आकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांना १९८० सालापासून सदर तलाठी कार्यालयातून जबरदस्तीने महसूल आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महसूल हा नियमबाह्य असल्यामुळे शासन महसूलापोटी भरलेली रक्कम परत करणार आहे का असल्यास केव्हा,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१) दि. ९/१/२०१३ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे प्राप्त झालेले आहे. त्यानुसार गटविकास अधिकारी मालवण यांना परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरात १.७% वीज मीटर नादुरुस्त आहेत व ते दुरूस्त करण्यासाठी ग्राहकास वारंवार हेलपाटे मारावे लागतात असल्याबाबत**

**(३०) २४९३७ (०६-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात १.७% वीज मीटर नादुरुस्त आहेत ते दुरूस्त करण्यासाठी ग्राहकास वारंवार हेलपाटे मारावे लागतात असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच प्रत्यक्षात मिटर न पाहता शेरा मारणे व मागील सहा महिन्यातील रीडिंगची सरासरी पाहून अंदाजे रीडिंग नमूद केल्याने दरमहा ५% ग्राहकांना बिल दुरूस्ती करुन घ्यावे लागते व दरमहा ९३०० तक्रारी महावितरण कडे केल्या जातात असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१५)** :(१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही, दरमहा सरासरी २२० ग्राहकांच्या वीज देयके दुरुस्तीच्या तक्रारी प्राप्त होतात व त्यांचे निराकरण करण्यात येते, अशा तक्रारींची सरासरी ०.०९% इतकी आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कात्रजच्या अंजनीनगर भागाजवळच्या खाणीमध्ये राडारोड टाकून खाण बुजवण्याचे काम करुन त्यावर प्लॉटींग करण्यात येत असल्याबाबत**

**(३१) २५४८६ (१०-०८-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रजच्या अंजनीनगर भागाजवळच्या खाणीमध्ये राडारोड टाकून खाण बुजवण्याचे काम करुन त्यावर प्लॉटींग करण्यात येत असून त्यामुळे महामार्गावर मोठा धोका निर्माण झाला असल्याची बाब २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आाहे का चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-११-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे माणगाव (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे कमी अधिक विजेच्या दाबामुळे कृषी पंप निकामी झाल्याबाबत**

**(३२) २५५३४ (१०-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माणगाव (ता.चंदगड जि.कोल्हापूर) येथे कमी अधिक विजेच्या दाबामुळे मोठ्या प्रमाणात कृषी पंप निकामी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी-अधिक विद्युतदाबाने नुकसान होऊ नये म्हणून नवीन उपकेंद्र देण्याची मागणी मा.उर्जा मंत्री यांचेकडे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनमार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार माणगाव येथे विद्युत उपकेंद्र उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीने चौकशी केली.

(४) माणगांव येथे वीज पुरवठ्यासाठी नवीन उपकेंद्र इन्फ्रा-२ योजनेंतर्गत निविदा क्र.टी-१७ मध्ये पुन:गठण प्रक्रियेमध्ये समाविष्ट झालेले आहे. सदर उपकेंद्रासाठी लागणाऱ्या शासकीय जागेसाठी लागणारी रक्कम महावितरण कंपनीने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक ११.८.२०१५ रोजी भरली असून जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिसोड (ता.येवला, जि.वाशिम) येथील रस्त्यावरील विद्युत तारा खाली लोबकळत असल्याबाबत**

**(३३) २५७१० (१०-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (ता.येवला, जि.वाशिम) येथील गावाअंतर्गतच्या रस्त्यावरील पतदिव्यांच्या खांबावरील विद्युत तारा ब-याच खाली लोबकळत असल्यामुळे गावात ब-याचवेळा शॉर्ट सर्किट होऊन विद्युत पुरवठा खंडीत होतो,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील जनित्र / रोहित्र देखील उघडेच ठेवलेले असतात, हे खरे आहे काय,
(३) असल्यस, लोबंणा-या विद्युततारामुळे व उघड्या जनित्रामुळे येथील गावक-यांचे जीवास धोका निर्माण झाला आह, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, येवता येथे तिन तिन महिन्या पासून विद्युत देयके देण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने वीज कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) होय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या रिसोड उपविभागाअंतर्गत रिठद वितरण केंद्रामध्ये मौजे येवता येथील गावाअंतर्गतच्या रस्त्यावरील काही भागातील पथदिव्याच्या खांबावरील गार्डीगच्या तारा खाली लोंबकळत असल्यामुळे जोराची हवा/वादळ आल्यास गावात काही वेळा शॉर्ट सर्किट होवून विद्युत पुरवठा खंडीत झालेला आहे, परंतु त्याची वेळीच दखल घेवून खाली आलेल्या गार्डीगच्या तारा ओढून घेण्यात आलेल्या आहेत,
(२) येवता गावातील वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्याकरीत १०० के.व्ही. ए. क्षमतेचे २ रोहित्रे आहेत, त्यापैकी एका रोहित्राच्या डिस्ट्रीब्युशन बॉक्सचे झाकण तुटून खाली पडले व ते अज्ञात इसमाने गहाळ केले, सदर बॉक्स बदलण्यात आला आहे,
(३) लोंबकळलेले गार्डीग तार ओढण्यात आले आहेत व झाकण नसलेले बॉक्स बदलण्यात आलेले आहेत,
(४) हे खरे नाही,
(५) प्रश्न उद्भवत नाही,
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्धापूर (जि.ठाणे) शहरासह तालुक्यातील मोठ्या गावांत घरगुती वीजग्राहकांना चुकीच्या रिडिंगमुळे जास्तीचे बील येत असल्याबाबत**

**(३४) २५९३३ (१०-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर शहरासह तालुक्यातील मोठ्या गावात घरगुती वीजग्राहकांना चुकीच्या रिडिंगमुळे मनस्तापाला सामोरे जावे लागत असून वीज बील दुरुस्त करण्यासाठी वीज वितरण कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत असून. मीटर रिडींग घेणारे संस्थाचे कर्मचारी प्रत्यक्ष मिटर न पहाता रिडींग घेत असल्याने ग्राहकांना अव्वाच्या सव्वा बील येत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील चुकीची रिडींग घेणाऱ्या वीज वितरण कंपनीची शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीने याप्रकरणाची चौकशी केली आहे.

(३) मे, २०१५ अखेर एकूण १८ बिले चुकीची आढळून आली. कंपनीकडून सदरची बिले ताबडतोब दुरुस्त करुन देण्यात आली व चुकीचे रिडींग घेणाऱ्या संस्थेला दंड आकारण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वाढत्या वीज रोहित्र चोऱ्याबाबत**

**(३५) २६०८८ (१०-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एप्रिल, २०१५ ते जून २०१५ या कालावधीत हजारो वीज रोहीत्र चोरीस गेले असून पुणे जिल्ह्यातील केडगाव विभागात ३३ रोहित्र चोरीस गेल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्र चोरी रोखण्यास व रोहित्र चोरीचे रॅकेट उध्वस्त करण्यास महावितरण व पोलीस प्रशासन अपयशी ठरल्याने रोहित्र चोरी रोखण्याचा उपाय म्हणून रोहित्र पालकत्व (स्थानिक नागरिकांना रोहित्र देखभालीची जबाबदारी देवून ही योजना राबवण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रोहित्रा होणारी चोरी थांबविण्यासाठी कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) हे खरे आहे. केडगांव विभागात एप्रिल २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत ४५ रोहित्रे चोरीस गेल्याच्या घटना घडल्या आहेत.

(२) हे खरे नाही. रोहित्र चोरीला प्रभावीपणे आळा बसण्यासाठी स्थानिक लोकांना वृत्तपत्राद्वारे जागरुक राहण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. तसेच रोहित्र चोरी झाल्यानंतर फौजदारी गुन्हा नजीकच्या पोलीस स्टेशनला नोद केला जातो. पोलीस अधिक्षक यांना सुध्दा रोहित्र चोरी रोखण्याबाबत  लक्ष घालण्यास विनंती केली आहे.

(३) रोहित्रांची होणारी चोरी थांबविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे :-

अ) गेल्या वर्षात केडगांव विभागात ८६० रोहित्रांना वेल्डींग करण्यात आले आहे.

ब)चोरीला जाण्याची जास्त शक्यता असलेल्या ७ रोहित्रांची जागा बदलून ती रोहित्रे लोकवस्तीच्या जवळ हलविण्यात आलेली आहेत ज्यायोगे या रोहित्रांची चोरीला जाण्याची शक्यता कमी होईल.

क) रोहित्रांची होणारी चोरी थांबविण्यासाठी महावितरण व पोलीस प्रशासन मिळून संयुक्त गस्त घालण्यात येत होती.

ड) केडगांव विभागात पायाभूत सुविधा आराखडा २ या योजनेंतर्गत १०१० रोहित्रांचा विद्युत दाब बदलून सदर रोहित्रे ११ केव्ही विद्युत दाबाची करण्याचे प्रस्तावित असून त्यातील २७४ रोहित्रे प्रत्यक्षात बदलण्यात आलेली नाहीत.

इ) केडगांव विभागांतर्गत रोहित्र चोरी रोखण्याचा उपाय म्हणून रोहित्र चोरीला प्रभावीपणे आळा बसवण्यासाठी स्थानिक लोकांना वृत्तपत्राद्वारे जागरुक राहण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथे कार्यरत असलेले उपअधिक्षक, भूमि अभिलेख यांच्या गैरकारभाराची तातडीने चौकशी करण्याबाबत

**(३६) २६१२० (१०-०८-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथे कार्यरत असलेले उपअधिक्षक, भूमि अभिलेख यांच्या गैरकारभाराची तातडीने चौकशी करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी  दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ रोजी व तद्नंतर दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी मा.महसूल मंत्री यांचेकडे निवेदनानुसार तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५) :**(१) होय,

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून उप अधीक्षक, भूमि अभिलेख, खेड जि. रत्नागिरी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १० अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही करुन ठपका ठेवण्याची शिक्षा बजावण्यात आली आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माढा व पंढरपूर तालुक्यातील मंजूर सबस्टेशनसाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत**

**(३७) २६२०१ (१०-०८-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा व पंढरपूर तालुक्यातील मंजूर सबस्टेशनसाठी जागा उपलब्ध नसल्याने सबस्टेशनची कामे माहे मे, २०१५ अखेर करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर सबस्टेशन उभारणी करणेबाबत जागा उपलब्धकरुन देण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) व (२) माढा व पंढरपूर तालुक्यातील मंजूर विद्युत उपकेंद्रांच्या कामाची सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| माढा | | |
| १ | प्रस्तावित उपकेंद्र | १३ |
| २ | उपकेंद्रासाठी मंजूर करण्यात आलेल्या जागा | १३ |
| ३ | त्यापैकी ठेकेदारास हस्तांतरीत करण्यात आलेल्या जागा | ११ |
| ४ | अधिग्रहण प्रक्रियेमध्ये असलेले प्रस्ताव | ०२ |
| | | |
| पंढरपूर | | |
| १ | प्रस्तावित उपकेंद्र | १० |
| २ | उपकेंद्रासाठी मंजूर करण्यात आलेल्या जागा | ०९ |
| ३ | त्यापैकी ठेकेदारास हस्तांतरीत करण्यात आलेल्या जागा | ०५ |
| ४ | अधिग्रहण प्रक्रियेमध्ये असलेले प्रस्ताव | ०४ |
| ५ | जागा उपलब्ध नसलेले उपकेंद्र | ०१ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील साधना हॉटेल ते लोकसेवा नागरी पथपेढीपर्यंत एच.टी. लाईनचे पोल खराब झाल्याबाबत**

**(३८) २६२२६ (१०-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील साधना हॉटेल ते लोकसेवा नागरी पथपेढीपर्यंत एच.टी. लाईनचे पोल खराब झाल्याने ते केव्हाही कोसळून जीवतहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे त्याठिकाणी नवीन पोल बसविण्याबाबतची मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, महावितरण कल्याण यांचेकडे दिनांक ९ मे, २०१५ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खराब पोल बदलून त्याठिकाणी नवीन पोल टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे. दिनांक ९.६.२०१५ च्या पत्राद्वारे लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, महावितरण कल्याण यांचेकडे मागणी केली होती.

(२) सदर ठिकाणची कंपनीकडून चौकशी केली असता ७ पोलपैकी १ पोल खराब असल्याचे आढळून आले.

(३) चौकशीच्या अनुषंगाने खराब एच.टी पोल बदली करण्याकरीता अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले असून सदर काम चालू करण्यात आले होते. परंतु एच.टी.पोल ज्या जागेत आहेत त्या जागेच्या मालकांनी सदर पोल बदली करण्यास हरकत घेतल्यामुळे काम प्रलंबित राहिल्यामुळे कनिष्ठ अभियंता, म्हारळ शाखा यांनी संबंधित जागा मालकास नोटीस देऊन सदरचे पोल बदली करण्यासाठी हरकत न घेण्याबाबत कळविले आहे व त्याची प्रत स्थानिक पोलीस स्टेशन, सरपंच यांना देण्यात आली आहे आणि त्यांचे सहकार्य घेऊन सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव एम.आय.डी.सी.मध्ये विद्युत पुरवठा नसल्याने तेथील उद्योग अद्याप सुरु झाले नसल्याबाबत**

**(३९) २६२८० (१०-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव एम.आय.डी.सी.मध्ये विविध कंपन्याचे युनिट उभारण्यात आले असून सदर एम.आय.डी.सी. मध्ये विदयुत पुरवठा नसल्याने सदर उद्योग अद्याप सुरु झाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त उद्योग तातडीने सुरु होण्यासाठी चाळीसगाव एम.आय.डी.सी. मध्ये एच.टी.व विजेचे ट्रान्सफार्मर तातडीने बसविण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २१ मे, २०१५ च्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनावर शासनाने विज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ औरंगाबाद यांचे मागणीनुसार चाळीसगांव औद्योगिक वसाहतीमध्ये येणाऱ्या नवीन उद्योगास वीज पुरवठा करण्याकरीता १.३ % सुपरव्हिजन स्किम मध्ये रु. १२५.४६ लाखाच्या तांत्रिक अंदाजपत्रकास दिनांक ४.७.२०१५ रोजी महावितरण कंपनीने मंजुरी दिली आहे. पुढील कार्यवाही प्राधान्याने सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदुरा (जि.बुलढाणा) येथे उच्च दाब क्षेमतेचे १३२ के.व्ही. सबस्टेशन अस्तित्वात नसल्याबाबत**

**(४०) २६४२७ (१०-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) येथे उच्च दाब क्षेमतेचे १३२ के.व्ही. सबस्टेशन अस्तित्वात नसल्यामुळे तालुक्यातील कृषीपंपाना, छोट्या-मोठ्या उद्योगाना तसेच इतर विद्युत उपभोकत्यांना पुरेश्या दाब क्षेमतेची विज मिळत नसल्यामुळे वारंवार विद्युत उपकरणे, कृषीपंपाचे नुकसान वेळोवेळी होत असल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या २० वर्षापासून औद्योगिक वसाहतीच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या व उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी प्रवृत्त होण्यासाठी १३२ के.व्ही. सबस्टेशनची निर्मीती व्हावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आजपावेतो शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसेंदिवस नांदुरा शहरासह तालुक्यातील ग्रामिण भागातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता तसेच नांदुरा तालुक्यात प्रस्तावीत असलेला व हरीतक्रांतीला पुर्णत्वास नेणारा जिगाव सिंचन प्रकल्प यासाठी १३२ के.व्ही. सबस्टेशन निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १३२ के.व्ही.सबस्टेशन निर्मीतीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही,

(२) दिनांक १९.०२.२०१५ रोजी शेगाव, जि.बुलढाणा येथे झालेल्या बैठकीमध्ये जलसंपदा विभागातर्फे महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली ओ.आर.सी. योजने अंतर्गत उभारण्यात येत असलेल्या १३२ के.व्ही. नांदुरा उपकेंद्रात १३२/३३ के.व्ही., व अतिरिक्त ५० एम.व्ही.ए. रोहित्र उभारण्याची मागणी केली होती.

(३) होय,

(४) सदर १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुमगाव इसासनी डिगडोह (देवी) (ता.हिंगणा,जि.नागपूर) येथे नवीन सबस्टेशन मंजूर असून काम सुरु न झाल्याबाबत**

**(४१) २६४६४ (१०-०८-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फेटरी (ता.जि.नागपूर) गुमगाव इसासनी डिगडोह (देवी) ता.हिंगणा येथे नवीन सबस्टेशन मंजूर झलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन सबस्टेशन उभारणीचे काम अद्यापही सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नविन सबस्टेशन उभरणीचे काम करण्यास शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) हे खरे आहे,

(२) व (३) पायाभूत आराखडा-२ अंतर्गत इसासनी डिगडोह (देवी) या उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर असून मौजे फेटरी येथील उपकेंद्राच्या जागेच्या उपलब्धतेनंतर लवकर काम सुरु करण्यात येईल, दिनदयाल उपाध्यय ग्राम ज्योती योजनेतंर्गत गुमगाव, ता. हिंगणा येथे तसेच नवीन ३३/११ केव्ही सबस्टेशन प्रस्तावित करण्यात आले असून सदर प्रस्तावास केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वारजे माळेवाडी (ता. हवेली, जि.पुणे) येथील जमिन शासनाने विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या आदर्श वसाहतीसाठी राखून ठेवल्याबाबत**

**(४२) २६५९४ (१०-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे माळेवाडी (ता.हवेली, जि.पुणे) येथील जमिनीचा सर्व्हे नं. ३६(१), ३६ (२), ३५(१), ३५(२) हि जमिन शासनाने विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या आदर्श वसाहतीसाठी राखून ठेवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नियोजित उन्नती सहकारी गृहरचना संस्थेस जागा देण्याबाबत दिनांक २३ ऑक्टोबर, १९९६ रोजी वा त्यासुमारास मा.मुंबई उच्च न्यायालयाने दोन निर्णय देऊनही त्याप्रमाणे या संस्थेस सन १९९५ ते माहे फेब्रुवारी, २०१३ रोजीपर्यंत मा. मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, संबंधित जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊनही अद्याप या संस्थेस शासनाने जागा दिली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीचे उमेदवार नाही अशा संस्थेस शासनाने सदर जागेमधील काही जागा दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नियोजित उन्नती सहकारी गृहरचना संस्था, पुणे या सस्थेंस त्वरीत जागा देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) मौजे वारजे, तालुका हवेली येथील सर्व्हे क्र. ३५/२ व ३६/२ च्या गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्कात "भटक्या विमुक्त जातीच्या आदर्श वसाहतीसाठी" अशी नोंद आहे.
(२) उन्नती सहकारी गृहरचना संस्थेस अद्याप सदर जागा प्रदान केल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) व (६) मंत्रालयीन इमारतीच्या दि. २१/०६/२०१२ रोजीच्या आगीमध्ये या विभागाचे अभिलेख नष्ट झाले असल्याने यापूर्वी झालेल्या कार्यवाहीचा बोध होत नाही. तथापि, यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून या प्रकरणीचा पुनर्बांधणी प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजेची कामे ठेकेदार कंपनीकडून वेळेत पूर्ण होत नसल्याबाबत

**(४३) २६७३३ (१०-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजेची कामे ठेकेदार कंपनीकडून वेळेत पूर्ण होत नसल्याने वीज वितरण कंपनीची कोट्यावधींची कामे रेगाळली असल्याचे माहे १ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १५०० शेहून अधिक कृषीपंप जोडण्याबरोबर नव्याने खांब बदलणे, ट्रान्सफॉर्मर बदलणे आदी कामांचा बोजबारा उडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वीज वितरणाची रेंगाळलेली कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) मार्च २०१४ अखरे पैसे भरलेलया प्रलंबित १३४१ वीज जोडण्यापैकी सन २०१४-१५ मध्ये ८१९ व सन २०१५-१६ मध्ये ९६ नवीन कृषीपंपाना वीज जोडण्यात देण्यात आल्या, तसेच २० नवीन रोहित्रे व १८ रोहित्रांची क्षमतावाढ पूर्ण झाली आहे. २५ नवीन रोहित्रे क्षमतावाढ, दोन नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्रे व संबंधित वाहिन्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच पायाभूत आराखडा-१ उर्वरित कामामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात २३३९ वीज खांब बदलण्यात आले असून २०८ वीज खांब बदलण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित कृषीपंपना वीज जोडण्या देण्यासाठीची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) ठेकेदाराकडे साधनसामुग्री उपलब्धअसून अतिरिक्त मनुष्यबळे वापरुन तफावत दुर करण्याबाबत सर्व स्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे. तसेच निश्चित ध्येयापासूनची तफावत दूर करण्यासंबंधात निविदेतील कायदेशीर तरतूदीनुसार तीन वेळेस नोटीस टू करेक्ट व दिनांक ४.९.२०१५ रोजी नोटीस टु टर्मिनेट देण्यात आलेली आहे. तसेच परिमंडहातील मुख्य अधिकाऱ्यांना माईलस्टोन पेक्षा मागे असलेल्या रु. २ कोटी पर्यंतच्या कामाच्या कामाबाबत समांतर निविदा काढण्याबाबत महावितरण कंपनीने संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणातील ३७५ गावातील मच्छीमारांच्या घरांच्या, मासळी सुकविण्याच्या वहिवाटीखालील जमिनीबाबत**

**(४४) २६८१५ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील ३७५ गावातील मच्छीमारांच्या घरांच्या, मासळी सुकविण्याच्या वहिवाटीखालील जमिनीची सात-बारा उताऱ्यावर घेण्याबाबत चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण आणि कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, सदर अहवालातील शिफारसींची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) होय.

(२) विभागीय आयुक्त, कोकण यांचा दि.१०/०७/२०१२ व दि.२/८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(३) कोकणातील मच्छीमारांच्या घरांच्या, मासळी सुकविण्याच्या वहीवाटीखालील जमिनीच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेण्याबाबतच्या कार्यवाहीची प्रगती प्रस्तुत अहवालात नमुद करण्यात आली आहे.

(४) कोकणातील मच्छीमारांच्या घरांच्या, मासळी सुकविण्याच्या वहीवाटीखालील जमिनीच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदवले बु/ (ता.माण.जि.सातारा) या गावाला येणारे विद्युत पंपाचे बील कोणत्याही ग्रामपंचायतीला परवडणारे नसल्याबाबत**

**(४५) २७०३७ (१०-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदवले बु/ (ता.माण, जि.सातारा) येथील या गावाला अंदळी जलाशयातील पिण्याचा पाण्याचा पुरवठा होत असून या योजनेसाठी येणारे विद्युत पंपाचे बील कोणत्याही ग्रामपंचायतीला परवडणारे नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या विद्युत बिलाबाबत कमर्शियल ऐवजी घरगुती वापरसाठीचे बिला इतके आकारणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. गोंदवले बु. (ता.माण, जि.सातारा) येथील पिण्याच्या पाण्याचा दोन उच्चदाब विद्युत जोडणीस महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार सार्वजनिक पाणी पुरवठा या वर्गवारीनुसार सार्वजनिक पाणी पुरवठा या वर्गवारीनुसार वीज दर आकारुन देयके दिली जातात व सदर देयकांचा नियमित भरणा संबंधितांकडून केलेला दिसून येतो.

(२) सदर दोन्ही वीज जोडणीस वाणिज्यिक दराप्रमाणे वीज आकारणी केली जात नसून त्यांच्या वीज वापराप्रमाणे सार्वजनिक पाणी पुरवठा वर्गवारीनुसार वीज आकारणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जामखेड मध्यम प्रकल्प अंतर्गत बाधीत हसनाळ (प. दे.)**
**ता.मुखेड येथील शेतकऱ्याच्या वाढीव मावेजाबाबत**

**(४६) २७१६६ (१०-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखैड मध्यम प्रकल्प अंतर्गत (ता.मुखेड, जि.नांदेड) या प्रकल्पांतर्गत बाधीत हसनाळ (प.दे.) ता.मुखेड येथील शेतकऱ्यांच्या शेतजमीनीचा वाढीव मावेजा मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांना वाटप करणे गरजचे असताना भुसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्याकडे निधी उपलब्ध असताना अद्यापही वाढीव मावेजा वाटप करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मावेजा वाटप न करण्याऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) :**(१) हे खरे नाही,

परंतु जामखेड मध्यम प्रकल्प अंतर्गत मौ. हसनाळ (प.दे) ता. मुखेड येथील संपादित जमिनीसाठी मा. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयानुसार संपादित संघाकडून वाढीव मोबदला निधी प्राप्त करुन घेऊन सन १९९६ ते २००० दरम्यान दिवाणी न्यायालयात जमा करण्यात आलेला आहे,

(२) जामखेड मध्यम प्रकल्प अंतर्गत सद्यस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचेकडे निधी उपलब्ध नाही, सदर प्रकरणतील मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रती उपलब्ध होताच संपादक संघाकडे निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून घेण्यात येत आहे,

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या वसई मंडळ विभागसाठी मॅकलिफ्टर मिळण्याबाबत**

**(४७) २७३५३ (१०-०८-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या वसई मंडळ विभागासाठी मॅकलिफ्टर मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जामंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वसई परिमंडळास मॅकलिफ्ट देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५)** :(१) संबंधित लोकप्रतिनिधींना प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्याकडे दिनंक १६ जानेवारी, २०१५ रोजी निवेन दिलेले आहे,
(२) होय,
(३) महावितरण कंपनीच्या वसई मंडळाकरिता कामाच्या गरजेनुसार मॅकलिफ्टर भाडेतत्वावर घेऊन कामे करण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत सदर मंडळास सूचना देण्यात आल्या आहेत,
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील म.रा.वी वितरण कंपनीद्वारा पुरविण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्याच्या वितरण प्रणाली मध्ये सुधारणा करण्याबाबत**

**(४८) २७३५५ (१०-०८-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजीच्या निवेदनाद्वारे वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील म.रा.वी वितरण कंपनीद्वारा पुरविण्यात येणा-या वीज पुरवठ्याच्या वितरण प्रणाली मध्ये सुधारणा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री याच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी ६७ कोटी रु. खर्चाचा असलेला सुसंगत प्रस्ताव वसई परिमंडळ कार्यालयाने मुख्य अभियंता कार्यालयास पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२)हे खरे आहे. वसई विरार महानगरपालिका अंतर्गत वीज वितरण प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी (एकात्मिक उर्जा विकास योजना) आयपीडीएस या योजनेंतर्गत रु. ८६.९६ कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दिनांक २८.७.२०१५ रोजी मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.
(३) एकात्मिक उर्जा विकास योजना (आयपीडीएस) चा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरीच्या अंतिमक टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई शिक्षण संस्था (एम.ई.टी) यांनी शासनाने घातलेल्या अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत

**(४९) २७५१२ (१०-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जवळील गोवर्धन येथील २३ एकरचा शासकीय भुखंड देताना मुंबई शिक्षण संस्था (एम.ई.टी), ला शासनाने घेतलेल्या अटी शर्तीचा भंग केल्याचे माहे जुन, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.ई.टी. ने अटी व शर्तीचा भंग केल्याने २३ एकरचा भुखंड शासनाने परत घेण्याबाबत नाशिकच्या जिल्हाधिकारी यांनी सन २०१२ मध्ये शासनाकडे शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, असल्यास गोवर्धन येथील २३ एकरचा शासकीय भुखंड परत घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१), (२), (३) व (४) महालेखापाल नागपूर यांचे निरीक्षण पथकाने सन २०१०-११ मध्ये जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाची कार्यालयीन तपासणी केली असता, त्यामध्ये मौजे गोवर्धन ता.जि.नाशिक येथील ९.१३ हे .आर शासकीय भुखंड मुंबई एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेला प्रदान केलेल्या आदेशात नमुद अटी व शर्तीचा भंग केलेबाबतचा आक्षेप घेतला आहे. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या कडील दिनांक १०/९/२०१२ व दिनांक १५/४/२०१५ रोजीच्या शर्तभंग प्रस्तावाच्या अनुषंगाने मौजे गोवर्धन येथील गट नं.३२ मधील ९.१३ हे .आर जमीन शर्तभंग झाल्यामुळे परत घेण्याबाबत शासनाकडे प्रकरण निर्णयार्थ पाठविण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी अर्जदार संस्थेने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक ६/१०/२०१५ रोजी सुनावणी घेतली असून प्रकरणी निर्णयार्थ बंद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या महानिर्मिती कंपनीतील कनिष्ठ अभियंता पदाच्या भरती प्रक्रियेत खेळांडूसाठी आरक्षित असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(५०) २७६४९ (१०-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या महानिर्मिती कंपनीने कनिष्ठ अभियंता पदासाठी जाहिरात क्र.०७ ऑगस्ट ०१२ अन्वये केलेल्या भरती प्रक्रियेत खेळाडूंसाठी १५ जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आरक्षणातंर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणपत्रांच्या वैधतेचा अहवाल आजतागायत संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून प्राप्त न झाल्याने सदर जागा रिक्त राहिल्या असून सदरचा अनुशेष पुढील भरती करता येणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त जागा गुणांनुसार पुढील उत्तीर्ण खेळाडू उमेदवारांच्या मुलाखती घेऊन तात्काळ भरण्याबाबत शासनाकडून आजपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्र.राक्रिधो.२००२ /प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दि.३०.०४.२००५ अन्वये खेळाडूसाठींचे आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे त्याचा अनुशेष पुढे नेता येणार नाही.
(३) कनिष्ठ अभियंता या पदाकरीता घेण्यात आलेल्या परीक्षेत खेळाडू आरक्षण अंतर्गत पात्र ठरलेल्या एकूण १२ उमेदवारांच्या नावाचा समावेश अंतिम निवड यादीत करण्यात आला होता. त्यापैकी संचालक, क्रिडा व युवक सेवा, यांनी "खेळाडू प्रमाणपत्रे" वैध ठरविलेल्या ४ उमेदवारांची कंपनीने नियुक्ती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.